शुक्रवार, ८ ऑक्टोबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ८१
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग
पनवेल तक्का येथे कोरोना प्रतिबंधक लसीकरण केंद्र/२
जि. प.च्या ४६ शाळांवर समायोजनाची कुऱ्हाड/५
रायगडच्या दोरी उडी खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड/६

## सणासुदीच्या काळात आरोग्याबाबत सतर्कतेचा इशारा



**नवी दिल्ली :** देशातील कोरोनाबाबतची आव्हाने अद्याप संपलेली नाहीत. केरळ, महाराष्ट्र, तमीळनाडू, मिझोराम आणि कर्नाटक या पाच राज्यांत कोरोनाचे १० हजारांहून अधिक सक्रिय रुग्ण आहेत, असे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे तसेच शासनाने म्हटले आहे की, तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर जवळपास पाच लाख ऑक्सिजन बेड तयार करण्यात आले आहेत. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे सहसचिव लव अग्रवाल यांनी सांगितले की, देशातील कोरोनाबाबतचे आव्हान अद्याप संपलेले नाही. काही प्रमाणात आपण कोरोनाच्या दुसऱ्या लाटेवर नियंत्रण ठेवू शकलो नाही. आपल्याला कोरोनावर नियंत्रण ठेवण्यासाठी सतत प्रयत्न करण्याची गरज आहे. विशेषतः पुढील तीन महिने सणासुदीचे आहेत. अशा वेळी अधिक सतर्कता बाळगण्याची आवश्यकता आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# नरेंद्र मोदी जनहित साधणारे पंतप्रधान

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन ▪ पनवेलमध्ये लाभार्थ्यांचा सन्मान सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशातील सर्वसामान्य, गोरगरीब जनतेच्या हिताचा विचार करणारा पंतप्रधान आपल्याला नरेंद्र मोदी यांच्या रूपात मिळालेला आहे. आज वयाच्या ७१व्या वर्षीही ते तासन्तास झटून काम करतात. त्यांना तुमच्या ताकद, आशीर्वादाची गरज आहे. म्हणजे आणखी १० वर्षे ते जोमाने काम करतील आणि देशवासीयांचे एकंदर जीवनमान अजून सुधारेल, असे प्रतिपादन भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि. ६) येथे केले.

जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेता आणि भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १७ सप्टेंबर या वाढदिवसापासून ते त्यांच्या संविधानिक कारकिर्दीला २० वर्षे पूर्ण होईपर्यंत म्हणजेच ७ ऑक्टोबरपर्यंत भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात सेवा व समर्पण अभियान राबविण्यात आले. त्या अंतर्गत पनवेल येथे केंद्र सरकारच्या विविध योजनांचा जे लाभ घेत आहेत अशा लाभार्थ्यांचा सन्मान सोहळा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी संघचालक मनोहर ओझे, पटवर्धन स्मृती रुग्णालय समितीचे राजीव समेळ यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.



पनवेल शहरातील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या सन्मान सोहळ्यास शहर अध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस व नगरसेवक नितीन पाटील, नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, नगरसेविका चारुशीला घरत, रूचिता लोंढे, सरचिटणीस अमरिश मोकल, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, जिल्हा उपाध्यक्ष गीता चौधरी, राहुल वाहूळकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लाभार्थी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होतील म्हणजे १५ ऑगस्ट २०२२ रोजीपर्यंत या देशातील गोरगरीब, झोपडपट्टीत राहणाऱ्या जनतेला प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर मिळाले पाहिजे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे. भाजपच्या ताब्यातील पनवेल महापालिका महिनाभरात पहिला ठराव आणतेय तो म्हणजे पनवेल महापालिका हद्दीत २२०० घरे आपण प्रधानमंत्री आवास योजनेतून देऊ शकणार आहोत. यासाठी जो घरे घेईल त्याला केंद्र सरकार दीड लाख रुपये देते. राज्य सरकारने एक लाख देणे आहे, तर कुष्ठरुग्णांना आणखी दीड लाख केंद्राकडून देण्यात येतात. अशा प्रकारे गरिबांना स्वतःचे हक्काचे घर मिळावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत.

भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी संघचालक मनोहर ओझे आणि पटवर्धन स्मृती रुग्णालय समितीचे राजीव समेळ यांनीही आपले विचार मांडले.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय, प्रधानमंत्री जनकल्याण योजना अंतर्गत रेशन आणि उज्ज्वला गॅस या योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन या वेळी सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल लाभार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

**देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कार्य महान आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या माध्यमातून विविध घटकांसाठी निरनिराळ्या योजना राबविण्यात येत आहेत. त्याचा लाभ आज देशभरातील लाखो नागरिकांना मिळत आहे.**

**–जयंत पगडे, अध्यक्ष, पनवेल शहर भाजप**

**सरकारने आखलेल्या योजना शेवटच्या माणसापर्यंत पोहचविण्याचे काम कार्यकर्ते करीत असतात. यात भाजप कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. आपले पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर तर कार्यसम्राट आहेत आणि आपण सर्व जण त्यांच्या पाठीशी आहोत.**

**–मनोहर ओझे, माजी संघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ**

**पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा जो कार्यक्रम आयोजित केला आहे तो स्तुत्य आहे. समाजातील तळागाळातील लोकांकरिता पंतप्रधान मोदींनी विविध योजना आणल्या. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत आमदार प्रशांत ठाकूर कार्यरत आहेत.**

**–राजीव समेळ, पटवर्धन स्मृती रुग्णालय समिती**

# अजित पवारांना मोठा धक्का

## ▪ जरंडेश्वर साखर कारखान्यावर इन्कम टॅक्सचा छापा

**सातारा : प्रतिनिधी**



साताऱ्यातील जरंडेश्वर साखर कारखान्यावर प्राप्तिकर विभागाने छापा टाकला आहे. जरंडेश्वर साखर कारखाना हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात आहे. विशेष म्हणजे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी बुधवारी जरंडेश्वर कारखान्याला भेट दिली होती. त्यानंतर लगेचच ही कारवाई करण्यात आली आहे.

कोरेगाव तालुक्यातील जरंडेश्वर कारखान्यावर दाखल झालेल्या बऱ्याच सभासदांनी कारखाना सभासदांच्या ताब्यात यावा, अशी प्रमुख मागणी किरीट सोमय्या यांच्याकडे केली होती. कारखाना चांगला सुरू होता. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उसाचे क्षेत्रही मोठे होते, मात्र त्या वेळी कवडीमोल भावाने कारखान्याचा व्यवहार केला. हा कारखाना सामान्य माणसांचा आहे. सत्तेच्या जोरावर बेकायदेशीररीत्या कारखाना ताब्यात घेण्यात आलाय. पुन्हा कारखाना सभासदांचा व्हावा. तुम्हाला आवाहन करतो की, तुम्ही काही करा, कसेही करा आम्हाला कारखाना पुन्हा मिळवून द्या, अशी मागणी जरंडेश्वर कारखान्याच्या सभासदांनी सोमय्यांकडे कारखाना स्थळावरच केली. त्यावर सोमय्या यांनी या वेळी शेतकऱ्यांना पूर्णपणे न्याय दिला जाईल. कोणत्याही परिस्थितीत कारखाना बंद पडणार नाही, मात्र उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कारखान्याच्या व्यवहाराची पूर्ण चौकशी होईल, असे सांगितले होते. याआधी अंमलबजावणी संचालनालयानेही (ईडी) या कारखान्यावर जप्तीची कारवाई केली होती.

दरम्यान, पवार यांचा मुलगा पार्थ आणि बहिणीच्या तसेच अन्य संबंधित कार्यालयांवरही छापेमारी करण्यात आली आहे.

## ‘भक्तीचे दार’ अखेर उघडले

**मुंबई : प्रतिनिधी**

विरोधकांच्या वाढत्या दबावानंतर अखेर राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील धार्मिक स्थळे गुरुवारी (दि. ७) उघडली. त्यामुळे भाविकांची दर्शनासाठी विविध मंदिरांत गर्दी झाली होती.

कोरोनामुळे गेल्या वर्षी मार्च महिन्यापासून धार्मिक स्थळांचे दरवाजे भाविकांसाठी बंद झाले होते. यंदा कोरोना आटोक्यात येऊनही धार्मिक स्थळे उघडली जात नव्हती. त्यामुळे भाजपने अनेकदा आंदोलने केली होती.

## परतीच्या पावसाने भातशेतीचे नुकसान

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सर्वत्र भाताचे पीक भरघोस आले असताना अतिवृष्टी, वादळी पाऊस आणि आता परतीच्या पावसामुळे अनेक ठिकाणी भातशेतीचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यात वारा व विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळत असल्याने भाताची उभी पिके आडवी झाल्याचे चित्र आहे.

परतीच्या वादळी पावसामुळे सुधागड, रोहा, माणगाव, कर्जत, खालापूर, महाड, श्रीवर्धन, पेण, अलिबाग आदी सर्वच तालुक्यांतील भातपीक धोक्यात आले आहे. या पावसामुळे काढणीला आलेले भातपीक व काढून ठेवलेल्या भाताचे नुकसान झाले असण्याची शक्यता आहे. सर्व पंचनामे झाल्यानंतर एकूण नुकसानीची आकडेवारी मिळेल, असे जिल्हा कृषी उपसंचालक दत्तात्रेय कळभोर यांनी सांगितले.

दरम्यान, हवामान खात्याने पुढील तीन ते पाच दिवस मुसळधार पावसाची शक्यता वर्तवून सतर्कतेचा इशारा दिल्याने शेतकरी धास्तावले आहेत.

## निवडक

### यूपीत भीषण अपघातात नऊ ठार, २७ जण जखमी

**बाराबंकी :** उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यात गुरुवारी (दि. ७) पहाटे एका वाळूच्या ट्रकने बसला दिलेल्या जोरदार धडकेत नऊ जणांचा मृत्यू झाला असून २७ जण जखमी झाले आहेत. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अपघाताबद्दल शोक व्यक्त करीत मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी दोन लाख आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

### चालू आर्थिक वर्षात भारताचा जीडीपी वाढण्याचा अंदाज

**नवी दिल्ली :** जागतिक बँकेने प्रकाशित केलेल्या अहवालात भारताच्या आर्थिक वृद्धीचे संकेत देण्यात आले आहेत. २०२१-२२ या चालू आर्थिक वर्षांत भारताचा जीडीपी ८.३ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे. पुढील आठवड्यात वॉशिंग्टनमध्ये दक्षिण आशिया इकॉनॉमिक फोकसची बैठक होणार आहे. त्याआधीच हा अहवाल प्रसिद्ध झालाय.

## शेलार, मुनगंटीवार, वाघ भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत

**मुंबई : प्रतिनिधी**



भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची यादी गुरुवारी (दि. ७) जाहीर करण्यात आली असून यात महाराष्ट्रातील आधीच्या नावांसोबतच नव्या काही नेत्यांचा समावेश करण्यात आला आहे.

भाजपने राष्ट्रीय कार्यकारिणीच्या ८० सदस्यांची नावे असणारी यादी जाहीर केली. यामध्ये विशेष निमंत्रित म्हणून आमदार आशिष शेलार, सुधीर मुनगंटीवार आणि लड्डाराम नागवानी यांचा समावेश करण्यात आला आहे. त्याचबरोबर प्रकाश जावडेकर, विनय सहस्त्रबुद्धे, चित्रा वाघ यांना कार्यकारिणीत सदस्य म्हणून संधी देण्यात आली आहे. याशिवाय पदाधिकारी म्हणून विनोद तावडे (राष्ट्रीय मंत्री), सुनील देवधर (राष्ट्रीय मंत्री), पंकजा मुंडे (राष्ट्रीय मंत्री), हीना गावित (राष्ट्रीय प्रवक्त्या), जमाल सिद्दिकी (अल्पसंख्याक मोर्चा), देवेंद्र फडणवीस (माजी मुख्यमंत्री) यांची नावे कायम आहेत.

### अडवाणी, जोशींचाही समावेश



*भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांचा समावेश करण्यात आला आहे. या यादीत राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य म्हणून पहिले नाव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आहे. पंतप्रधानांनंतर दुसरे नाव पक्षाचे सर्वांत ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचे, तर त्यांच्यापाठोपाठ तिसरे नाव मुरली मनोहर जोशी यांचे आहे. त्यामुळे आता हे दोन्ही नेते पक्षाच्या मुख्य प्रवाहात आले आहेत.*

## आर्यन खानला न्यायालयीन कोठडी

**मुंबई : प्रतिनिधी**

क्रूझवर ड्रग्ज पार्टी केल्याच्या आरोपावरून अमली पदार्थविरोधी (एनसीबी) विभागाच्या अटकेत असलेला बॉलीवूड अभिनेता शाहरूख खानचा मुलगा आर्यन व इतर सहा जणांची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली आहे.



आर्यन खानची एनसीबी कोठडी गुरुवारी (दि. ७) संपणार असल्यामुळे त्याला व इतर आरोपींना मुंबईतील न्यायालयात हजर करण्यात आले होते, तर आर्यनच्या वकिलांनी पुन्हा एकदा जामीन याचिका दाखल केली होती. या वेळी एनसीबीने कोठडी वाढवून मागितली. न्यायालयाने आरोपींची ११ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे.



**पनवेल : शक्ती आणि समृद्धीचे प्रतीक असलेल्या शारदीय नवरात्रोत्सवाला गुरुवारपासून सुरुवात झाली आहे. शहरातील मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना विधिवत पूजा करून करण्यात आली.**



## रायगड जिल्ह्यात कोरोना लसीकरण विशेष मोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**



कोरोना प्रादुर्भाव, तसेच त्यामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी प्रतिबंधक लस घेणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात ८ ते १४ ऑक्टोबरदरम्यान मिशन कवच कुंडल नावाने विशेष कोरोना लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातही ही मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांनी दिली. त्याचप्रमाणे नवरात्री विशेष म्हणून महिलांसाठी ११ ऑक्टोबर रोजी विशेष लसीकरण होणार आहे.

जिल्ह्यात विशेष कोरोना लसीकरण मोहिमेसाठी नियोजन करण्यात आले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रत्येक गावाच्या लोकसंख्येनुसार, तसेच शिल्लक राहिलेल्या लाभार्थींच्या संख्येनुसार प्रत्येक दिवशी लसीकरण सत्र आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून प्रत्येक गावासाठी टीम निश्चित करून लसीकरण पूर्ण करण्यात येणार आहे. एका गावाचे लसीकरण पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या गावाचे लसीकरण ही टीम करेल अशा प्रकारे संपूर्ण प्राथमिक आरोग्य केंद्रात पहिल्या डोसचे प्राधान्याने आणि दुसरा डोस देय असलेल्या लाभार्थींचे लसीकरण करण्यात येणार आहे.



# पुढील तीन महिने सणांचे; सतर्क राहा

## केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे नागरिकांना आवाहन

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

देशातील कोरोनाबाबतची आव्हाने अद्याप संपलेली नाहीत. केरळ, महाराष्ट्र, तमीळनाडू, मिझोराम आणि कर्नाटक या पाच राज्यांत कोरोनाचे १० हजारांहून अधिक सक्रिय रुग्ण आहेत, असे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे. तसेच सरकारने दावा केला आहे की तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर जवळपास पाच लाख ऑक्सिजन बेड तयार करण्यात आले आहेत.



आरोग्य मंत्रालयाचे सहसचिव लव अग्रवाल यांनी सांगितले की, देशातील कोरोनाबाबतचे आव्हान अद्याप संपलेले नाही. आपल्याला कोरोनावर नियंत्रण ठेवण्यासाठी सतत प्रयत्न करण्याची गरज आहे. पाच राज्यात (केरळ, महाराष्ट्र, तमीळनाडू, मिझोराम आणि कर्नाटक) अजूनही १०,००० पेक्षा जास्त सक्रिय प्रकरणे आहेत.

देशातील एकूण पॉझिटिव्हिटी रेट मागील आठवड्यात १.६८% होता, तर यापूर्वी हा ५.८६% होता, असे लव अग्रवाल यांनी सांगितले. तसेच ते म्हणाले की, अरुणाचल प्रदेश आणि आसाममधील काही जिल्ह्यांसह २८ जिल्हे आहेत, ज्यात पॉझिटिव्हिटी रेट ५% ते १०% दरम्यान आहे, म्हणजे उच्च संसर्ग दर. तर ३४ जिल्हे असे आहेत, जिथे आठवड्याचा पॉझिवटिव्हिटी रेट १०% पेक्षा जास्त आहे.

आरोग्य मंत्रालयाने कोरोनाच्या तिसऱ्या लाटेच्या तयारीविषयी सांगितले की, राज्यांमध्ये ८.३६ लाख हॉस्पिटल बेड तयार करण्यात आले आहेत. ९.६९ लाख आयसोलेशन बेड उपलब्ध आहेत. देशभरात ४.८६ लाख ऑक्सिजन बेड आहेत. त्याचप्रमाणे १.३५ लाख आयसीयू बेड तयार करण्यात आले आहेत. डॉ. व्ही. के. पॉल म्हणाले की, सरकार दररोज ४.५ ते ५ लाखांपर्यंतच्या प्रकरणांची तयारी करत आहे. पहिला डोस ७१% लसीकरणापर्यंत पोहोचल्यानंतर कोणत्या प्रकारची प्रकरणे वाढतील, याची गणना करण्यासाठी आपल्याकडे कोणताही सरळ फॉर्म्युला नाही.

आरोग्य सचिव म्हणाले की, आतापर्यंत देशात कोरोनाची ३.३९ कोटी प्रकरणे नोंदली गेली आहेत, तर सध्या देशभरात २.४४ लाख सक्रिय प्रकरणे आहेत. देशभरात कोरोनाच्या प्रकरणांमध्ये घट झाली आहे, परंतु केरळमध्ये अजूनही जास्त कोरोना रुग्ण असल्याचे समोर येत आहे. कोरोना प्रकरणांमध्ये, केरळमध्ये सर्वाधिक ५०%पेक्षा जास्त प्रकरणांची नोंद होत आहे, तर महाराष्ट्र १५.०६%, तमीळनाडू ६.८१% आणि मिझोरम ६.५८% प्रकरणे समोर येत आहेत. आरोग्य मंत्रालयाच्या मते ५%पेक्षा जास्त पॉझिटिव्हिटी रेट असलेल्या राज्यांमध्ये मिझोरम आघाडीवर आहे. मिझोरममध्ये २१.६४% आणि केरळमध्ये १३.७२% पॉझिटिव्हिटी रेट आहे. त्यानंतर सिक्कीम, मणिपूर आणि मेघालयचा नंबर लागतो.

आरोग्य मंत्रालयाने लोकांना सणासुदीच्या काळात अधिक सावधगिरी बाळगण्याचा इशारा देताना सांगितले की, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर हे सणांचे महिने आहेत आणि या काळात लोकांनी सावधगिरी बाळगली पाहिजे. सणासुदीच्या काळात लोकांनी सावध राहावे, असा इशारा मंत्रालयाने दिला आहे. मास्क घालणे खूप महत्त्वाचे आहे. लसीकरण हे एका ढालीसारखे आहे.

## अभीष्टचिंतन!





**पनवेल : भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सचिव चिन्मय समेळ यांना वाढदिवसानिमित्त भाजप जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष मयूरेश नेतकर, शहर अध्यक्ष रोहित जगताप आदी उपस्थित होते.**

# तळोजा फेज-२मधील दफनभूमी आणि स्मशानभूमी दुरुस्तीच्या अंदाजपत्रकाला मंजुरी

**पनवेल : प्रतिनिधी**

तळोजा फेज–२मधील दफनभूमी आणि स्मशानभूमीची दुरुस्ती करून नागरिकांना तेथे सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी लवकरात लवकर अंदाज पत्रक तयार करून त्याला मंजुरी घेण्याच्या सूचना सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गुरुवारी (दि. ७) महापालिकेत झालेल्या बैठकीत पालिका अभियंत्यांना दिल्या.

पनवेल महापालिका हद्दीतील तळोजा फेज–२मधील मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मियांच्या दफनभूमी व हिंदूंच्या स्मशानभूमीची अवस्था दयनीय झाल्याबद्दल तेथील नागरिकांच्या तक्रारी आल्याने सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बुधवारी (दि. ६) रोजी त्या ठिकाणी नगरसेवक हरेश केणी, निर्दोष केणी, प्रल्हाद केणी व वासुदेव पाटील यांच्या समवेत भेट देऊन पाहाणी केली. या तिन्ही ठिकाणी अत्यंत दयनीय अवस्था असल्याचे पाहून सभागृह नेत्यांनी गुरुवारी महापालिकेत स्थानिक नागरिक व पालिका अभियंत्यांसोबत बैठक घेतली.



या बैठकीत सभागृह नेत्यांनी तळोजा फेज–२मधील दफनभूमी आणि स्मशानभूमीची दुरुस्ती करून तेथे बसण्यासाठी व प्रार्थना करण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे, शौचालयाची सुविधा, कार्यालय व सुरक्षा रक्षक केबिन उपलब्ध करून देण्याच्या सूचना महापालिका कार्यकारी अभियंता संजय काटेकर व शहर अभियंता संजय जगताप यांना दिल्या. हिंदूंची स्मशानभूमी अद्याप महापालिकेकडे हस्तांतर झालेली नाही. ती हस्तांतर करण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून तिन्हीचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी पाठवण्यास सांगितले.



**पनवेल : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या मोहिमेंतर्गत प्रभाग क्रमांक १७मधील स्वच्छतादूतांना प्रभाग समिती 'ड'च्या सभापती सुशीला जगदिश घरत यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी स्वच्छता निरीक्षक भावेश जयंत चंदने, पर्यवेक्षक रमेश गरूडे, नंदू जाधव, तसेच साई गणेशचे उत्तम चिखलेकर, संदीप जाधव, क्रांती चितळे, दिनेश सोनवणे आणि कर्मचारी उपस्थित होते.**

## पनवेल तक्का येथे कोरोना लसीकरण केंद्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील भाजप नगरसेवकांच्या माध्यमातून प्रभागांमधील नागरिकांच्या समस्या जाणून त्या सोडविण्याचे काम सुरू आहे. त्या अंतर्गत तक्का येथील मोराज संकुलातील नागरिकांना कोरोना प्रतिबंधात्मक लस मिळावी ही विनंती नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे आणि नगरसेविका चारुशीला घरत यांना मोराज संकुलातील नागरिकांनी केली होती. त्यानुसार गुरुवारी एकदिवसीय लसीकरण केंद्र सुरू झाले.



कोरोना माहामरीचा प्रभाव कमी झाला असला तरी सर्व नागरिकांनी कोरोना प्रतिबंधात्मक लस घेणे आवश्यक आहे. त्यानुसार पनवेल तक्का येथील मोराज संकुलातील नागरिकांनी पनवेल महापालिकेचे नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे आणि नगरसेविका चारुशीला घरत यांना लसीकरण केंद्र सुरू करण्यासंदर्भात चर्चा केली होती. त्यानुसार गुरुवारी मोराज संकुलातील नागरिकांसाठी एकदिवसीय लसीकरण केंद्र सुरू झाले असून, या केंद्रामध्ये कोव्हिशिल्डची पहिली व दुसरी लस देण्यात येणात आहे.

या वेळी माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, संदीप बहिरा, वॉर्ड अध्यक्ष रघुनाथ बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, अतुल बहिरा, अफताब ताडे, जितू खुटकर, मोराज संकुलातील श्री. कदम, बबन कांबळे, शंकर खोत आदी उपस्थित होते.

# विधी सेवा समितीतर्फे जनजागृती शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने सर्वोच्च न्यायालयातर्फे भारतभर जनजागृती अभियान २ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबरपर्यंत राबविले जात आहे. त्यानुसार तालुका विधी सेवा समिती तथा जिल्हा न्यायालय पनवेल आणि पनवेल बार असोसिएशनतर्फे तहसील कार्यालय पनवेल येथे ज्येष्ठ नागरिकांचे अधिकार आणि ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणाऱ्या मोफत विधी सेवा या विषयाबाबत जनजागृती शिबिर आयोजित केले होते. या शिबिरासाठी आजूबाजूच्या ग्रामीण भागातील लोक उपस्थित होते.

या शिबिरासाठी ज्येष्ठ विधिज्ञ अनिल जाधव यांनी मार्गदर्शन केले. तुम्हाला न्याय मिळेल, पण ज्येष्ठ नागरिकांनी इथपर्यंत पोहोचले पाहिजे, असे मत या वेळी श्री. जाधव यांनी मांडले. पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणाऱ्या शासनाच्या विविध सुविधा याबाबत माहिती दिली आणि मार्गदर्शन केले. अमिटी लॉ कॉलेजचे विद्यार्थी गिरीश अंबापकर आणि प्रिया नायर, ज्येष्ठ नागरिक संघ पनवेलचे अध्यक्ष नंदकुमार जोशी व अन्य मान्यवर उपस्थित होते. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी तहसील कार्यालयातील कर्मचारी, तसेच पनवेल बार असोसिएशनचे पदाधिकारी यांनी विशेष प्रयत्न केले. पनवेल बार असोसिएशनचे वरिष्ठ वकील मनोज म्हात्रे, वकील धनराज तोकडे, वकील इंद्रजित भोसले यांचे विशेष सहाय्य मिळाले.

# सिडकोतर्फे इन्व्हेस्टमेन्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समीटचे आयोजन

**नवी मुंबई : सिडको वृत्त**

सिडको महामंडळातर्फे शुक्रवारी (दि. ८) सिडको इन्व्हेस्टमेन्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समीट (आभासी–व्हर्च्युअल)चे आयोजन करण्यात आले असून, नवी मुंबईमध्ये उपलब्ध असलेल्या गुंतवणुकीच्या विविध संधींविषयी या कार्यक्रमात चर्चा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात स्वतंत्र आणि समर्पित सत्रांमध्ये नवी मुंबईमध्ये यापूर्वीच ज्यांनी गुंतवणूक केली आहे असे गुंतवणूकदार नवी मुंबईत गुंतवणूक करण्याचे फायदे आणि नवी मुंबईमध्ये गुंतवणूक करण्याकरिता सर्वसाधारण माहिती याविषयी सर्वसाधारण जनतेशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमात नियोजित काळात विविध प्रकल्प पूर्ण करण्याच्या सिडकोच्या क्षमता आणि नवी मुंबईमध्ये सिडकोकडून करण्यात आलेली बांधकामे आणि विकास याबद्दलही माहिती देण्यात येणार आहे, तसेच नवी मुंबईतील आतिथ्य, आरोग्य, शिक्षण, क्रीडा व इतर क्षेत्रांचा विकास सुकर व्हावा, याकरिता सिडकोने हाती घेतलेल्या विविध विकास प्रकल्पांबद्दलही या कार्यक्रमात माहिती सांगण्यात येणार आहे.

सिडकोने नेहमीच नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सिडकोने अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आणि नवी मुंबईतील जीवनमान उंचवाण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास केला. महागृहनिर्माण योजना, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवी मुंबई मेट्रो, कॉर्पोरेट पार्क इ. प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर असून या प्रकल्पांमुळे नवी मुंबईतील पायाभूत विकास क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून येणार आहेत, तसेच सिडकोने शहराला उत्तम संधानता (कनेक्टिव्हिटी) लाभण्यावर लक्ष केंद्रित केल्यामुळे भावी गुंतवणूकदारांना गुंतवणुकीच्या उत्तम संधी उपलब्ध होणार आहेत.

सदर कार्यक्रम हा सिडको आणि भावी गुंतवणूकदार, विकसक, बांधकाम कंपन्या व संघटना यादरम्यान संवाद प्रस्थापित करण्याकरिता उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे सिडकोला नवी मुंबईमध्ये गुंतवणुकीच्या व्यवहार्य आणि आकर्षक संधी निर्माण करण्याकरिता उपाययोजना आणि धोरण आखण्यास मदत होणार आहे. हा कार्यक्रम (समीट) सर्व गुंतवणूकदार आणि सर्वसामान्य नागरिकांकरिता खुला असून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याकरिता https://avtaar.eletsonline.com/cidco/registration या संकेतस्थळावर नोंदणी करण्यात यावी. कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी http://cidco.eletsonline.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, खालीलप्रमाणे महसूल खात्याने त्याप्रमाणे वर्णन केलेली शेतजमीन मिळकतीचे मालक **अलकाबाई काळू खारपाटील व इतर** रा. चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांच्या मालकीची खालीलप्रमाणे वर्णन केलेली

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे – चिरनेर, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रु.पै. |
|---|---|---|
| १९४/५ | ०–४४–००<br>पो.ख. ०–०७–२० | १९.२२ |

**यापैकी करुणा रामभाऊ पाटील फक्त ००–०६–०० एवढे क्षेत्रफळ**


सदर जमिन आमच्या अशिलांनी कायम खरेदी करण्याचे ठरविले असून त्या मिळकतीबद्दल कोणाचाही दान, बक्षीस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत खालीलप्रमाणे सही करणारे यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुद्यातील कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहित असल्याचे गृहीत धरून आमचे अशील सदरहू मिळकतीचा खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**ता. उरण** — **सही/–**

**दिनांक: ०७/१०/२०२१** — **ॲड. योगेश नामदेव म्हात्रे**

रा. कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड

मो. ८०९७१०८०६०/९८१९९१०८०८

**पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शुक्रवार, दि. ८ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस**
**(वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी–२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी–३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी–४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. रोटरी क्लब, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)
- १४. श्री गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
- १५. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १६. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली
- १७. सेंट्रल रेल्वे, पनवेल

**कोव्हॅक्सिन**

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
- ३. लिटिल वर्ल्ड मॉल, खारघर

**पनवेल ग्रामीण लसीकरण**

- देवीचा पाडा रा.जि.प. शाळा
- खांदा गाव प.म.पा. शाळा
- भिंगारी रा.जि.प. शाळा
- कामोठे रा.जि.प. शाळा
- तळोजे मजकूर रा.जि.प. शाळा

**निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता २०० व दुसऱ्या डोसकरिता १०० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**

## निवडक

### मोबाईल चोरणारी दुकल गजाआड

**पनवेल :** पनवेल तालुका परिसरातील पर्यटन केंद्रांवर आलेल्या पर्यटकांच्या मोबाईलवर डल्ला मारणाऱ्या दुकलीचा पनवेल तालुका पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या दोन आरोपींकडून पोलिसांनी एक लाख ९२ हजार रुपये किमतीचे १६ मोबाईल जप्त केले आहेत. हे दोन्ही आरोपी पनवेल तालुक्यातील वावंजे गावातील रहिवासी आहेत. रमेश रघुनाथ पाटील (वय ३२, वावंजे), जितेश भगवान जोगले (वय २४, रा. कुंभारपाडा, वावंजे) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

### गाडीच्या डिकीतून मोबाईल चोरला

**पनवेल :** ॲक्टिवा स्कुटीमधील डिकीमध्ये ठेवलेला एक मोबाईल फोन अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना तालुक्यातील मोरबे येथील धरणाच्या काठी घडली. रोहन हातमोडे हा तरुण त्याच्याकडील ॲक्टिवा स्कुटीमध्ये १५ हजार रुपये किमतीचा विवो कंपनीचा मोबाईल डिकीमध्ये ठेवून धरणाच्या काठी फिरण्यास गेला असता अज्ञात चोरट्याने डिकीचे लॉक तोडून लबाडीने मोबाईल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल पोलीस ठाण्यात केली आहे.

### कंटेनरच्या धडकेने एक जखमी

**पनवेल :** भरधाव कंटेनरच्या धडकेने एक मोटारसायकलस्वार जखमी झाल्याची घटना तालुक्यातील अजिवली येथे घडली आहे. दीपक काकडे (वय २५) हे त्यांच्या मोटारसायकलवरून आजिवली येथून जात असताना अज्ञात कंटेनरची धडक त्यांच्या गाडीला बसून त्यात ते जखमी झाले आहेत. या संदर्भातील तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### बनावट सोन्याचे दागिने हस्तगत

**पनवेल :** बनावट सोन्याचे दागिने बँकेत गहाण ठेवून, त्या सोन्यावर लाखो रुपयांचे कर्ज उकळणाऱ्या टोळीकडून खारघर पोलिसांनी २११.२ तोळे बनावट सोने जप्त केले आहे. खोट्या सोन्याला सोन्याच्या पाण्याची झळाळी देऊन ते सोने खरे असल्याचे भासवून त्यावर ही टोळी हे सोने बँकेत ठेवून कर्ज काढायची. त्या पैशावर अय्याशी करायची. याप्रकरणी खारघर पोलिसांनी या आठ जणांच्या टोळीपैकी चार आरोपींना अटक केली आहे. सवोवी वेन्सन मार्टिन (वय ४५, रा. नेरूळ), परशुराम सखाराम देवरूखकर (वय ४५, रा. खारघर), भरत शुभसिंग राजावत (वय ३०, रा. नेरूळ), सुनील फराटे (वय ४७, रा. खारघर) असे पकडलेल्या चार आरोपींची नावे आहेत. हे चार आरोपी अन्य फरारी असलेल्या चार आरोपींच्या मदतीने बनावट सोने खरे भासवून बँकेत ठेवायचे आणि त्याच्यावर कर्जाच्या स्वरूपात पैसे उकळत होते, मात्र कामोठे येथील तक्रारदार प्रमोद गर्ग यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर हा सर्व प्रकार समोर आला.

# आरटी-पीसीआर चाचण्यांची क्षमता वाढवणार

## ■ संभाव्य तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी उपाययोजना

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

संभाव्य तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी नेरूळ येथील मीनाताई ठाकरे सार्वजनिक रुग्णालयात सुरू करण्यात आलेल्या प्रयोगशाळेची दैनंदिन चाचणी क्षमता वाढविण्यात येणार आहे. सध्या या प्रयोगशाळेत दिवसाला दोन हजार चाचण्या करण्याची क्षमता आहे, पण ही क्षमता येत्या काळात थेट पाच हजार चाचण्या अशी होणार आहे.

कोरोनाच्या पहिल्या लाटेत राज्य शासनाने निश्चित केलेल्या प्रयोगशाळेतून करोना चाचणी केली जात होती. नाक व घशातील लाळेचे नमुने घेऊन करण्यात येणाऱ्या आरटी-पीसीआर चाचणीचे अहवाल येण्यास विलंब लागत होता. रुग्ण जास्त आणि प्रयोगशाळा कमी असल्याने या चाचणी अहवालांचा अनेक ठिकाणी गोंधळ उडत असल्याचे चित्र होते. एका खाजगी प्रयोगशाळेने एकाच रुग्णाचे २४ तासांत वेगवेगळे अहवाल देऊन या गोंधळात भर घातली होती. नवी मुंबईतील कोरोना रुग्णांची संख्या दिवसेदिवस वाढत असल्याने आयुक्त अभिजीत बांगर यांनी महापालिकेची प्रयोगशाळा उभारण्याचा निर्णय घेतला. नेरूळ येथील सार्वजनिक रुग्णालयाची इमारत नव्याने बांधण्यात आली असून हे रुग्णालय सुरू करण्याच्या प्रतीक्षेत होते. त्या रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावर ही प्रयोगशाळा कमी कालावधीत उभारण्यात आली. दिवसाला एक हजार कोरोना चाचणी करणारी ही प्रयोगशाळा केवळ ११ महिन्यांत सुरू करण्यात आली. त्यानंतर गेले वर्षभर या प्रयोगशाळेत शहरातील सर्व कोरोना रुग्णांची चाचणी केली जात असून आता ही क्षमता दोन हजार चाचण्यांची आहे. त्यामुळे आतापर्यंत पाच लाख ७५ हजार १३ चाचण्या करण्यात आलेल्या आहेत.

कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेचा धोका लक्षात घेऊन पालिकेने जय्यत तयारी केली आहे. यात या प्रयोगशाळेतील चाचणी क्षमता दिवसाला पाच हजार चाचण्यांची करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केवळ कोरोना काळासाठीच नाही, तर त्यानंतरही या प्रयोगशाळेत असाध्य आजारांवर निदान केले जाणार आहे.

### नवी मुंबईत प्रयोगशाळा अखंड सुरू

*गेल्या वर्षी ४ ऑगस्ट रोजी सुरू करण्यात आलेल्या या प्रयोगशाळेत वर्षभरात ४ लाख ५६ हजार चाचण्या झाल्या. आता ही संख्या पाच लाख ७५ हजारांवर गेली आहे. विशेष म्हणजे मीनाताई ठाकरे रुग्णालयातील दुसऱ्या मजल्यावर ११ दिवसांत उभारण्यात येणारी ही प्रयोगशाळा १८०० चौरस फूट क्षेत्रात आहे. गेले १४ महिने ही प्रयोगशाळा अखंड सुरू असून कोणत्याही दिवशी ती बंद ठेवण्यात आलेली नाही. ही प्रयोगशाळा सुरू होण्यापूर्वी महापालिकेला खाजगी व शासकीय प्रयोगशाळांवर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे चार दिवस अहवाल येण्यास विलंब लागत होते. या प्रयोगशाळेतून मात्र २४ तासांत अहवाल प्राप्त होत आहेत.*

### सीसीआर निधीचा महापालिकेकडून वापर

*विशेष म्हणजे चाचण्यांची क्षमता वाढवण्यासाठी महापालिकेने यासाठी आपल्या तिजोरीवर भार टाकलेला नाही तर त्यासाठी व्यवसायिक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधी वापरला जाणार आहे. ठाणे-बेलापूर मार्गावरील सर्वांत जुन्या जनित्र उत्पादन करणाऱ्या सिमेन्स कंपनीने ही चाचणी क्षमता वाढविण्यासाठी आर्थिक हातभार लावला आहे. करोना साथ संपुष्टात आल्यानंतर ही प्रयोगशाळा एचआयव्ही, कर्करोग यांसारख्या आजारांचे प्राथमिक निदान करण्यास मदत होणार आहे.*

# कामगार नेते स्व. श्याम म्हात्रे यांच्या जयंतीनिमित्त सर्वपक्षीय आदरांजली

**पनवेल : वार्ताहर**

ज्येष्ठ कामगार नेते स्व. श्याम म्हात्रे यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी (दि. ७) आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सर्वपक्षीय नेत्यांनी म्हात्रे यांच्या आठवणी जागवत त्यांना आदरांजली वाहिली.




या वेळी बोलताना भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, संघर्ष हा कामगार नेते श्याम म्हात्रे यांचा स्थायीभाव होता. त्यांनी कधीही यशापयशाची पर्वा केली नाही. त्यांचे जीवनच संघर्ष करण्यात गेले. ते कधीही स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी समाज जोडलेला होता. त्यामुळे जनता त्यांची सदैव ऋणी राहील.

कामगार नेते दिनेश पाटील यांनीही विचार मांडले. उपस्थितांचे आभार मानताना कोकण श्रमिक संघटनेच्या श्रुती म्हात्रे यांनी सांगितले की, स्व. श्याम म्हात्रे त्यांच्या कार्यामुळे जनतेच्या मनात बसले आहेत. जनकल्याण हेच ध्येय उरासी बाळगून त्यांनी जनतेची सेवा केली.

एकटा कॅटेलिस्ट आणि कोकण श्रमिक संघ यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास हिंद मजदूर सभा संघटनेचे ॲड. संजय वढावकर, वैजनाथ ठाकूर, संजीव म्हात्रे, जे. डी. तांडेल, निर्मला म्हात्रे, शिवसेनेचे रामदास शेवाळे, पंकज भगत, एकनाथ ठोंबरे आदींसह कामगार उपस्थित होते. कोरोना काळात ज्या कामगारांनी जनतेची सेवा केली त्यांना या वेळी गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे मार्ग सुखाचा या विषयावर संजीवन म्हात्रे यांचे व्याख्यान झाले.

# पिल्लईतर्फे फ्युचर सिटीज २०21 परिषद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पूर्वाश्रमीचे पिल्लई इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) येथे कॉन्फरन्स ऑन टेक्नॉलॉजिज फॉर फ्युचर सिटीज २०२१ आयोजित करण्यात येत आहे. पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ही संस्था १९९९ मध्ये डॉ. वासुदेवन पिल्लई यांनी स्थापन केली. ही संस्था एआयसीटीई मान्यताप्राप्त असून नॅककडून ए प्लस दर्जाची नवी मुंबई परिक्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था आहे.

पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने सद्यस्थितीला योग्य वाटेल अशा प्रकारे टेक्नॉलॉजिज फॉर फ्युचर सिटीज या नावाने एक परिषद शृंखला सुरू केली आहे. या शृंखलेतील पहिले पुष्प ८-९ जानेवारी २०१९ रोजी आयोजित करण्यात आले.

दुसरे पुष्प ८ व ९ ऑक्टोबर २०२१ रोजी आयोजित करण्यात येत आहे. (CTFC २०२१) भविष्यात (२०५०च्या नंतर) शहरांची जी अनिर्बंध अशी वाढ होणार आहे त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर चर्चा घडवून आणणे हे CTFC २०२१चे उद्दिष्ट आहे. भविष्यातील या समस्यांचे जरी पूर्णपणे निराकरण करता आले नाही. तरी झालेल्या चुका दुरुस्त करून होणारे नुकसान कमीत कमी कसे असेल हे डोळ्यासमोर ठेवून उढऋउ २०२१ परिषद हे एक छोटे, पण महत्त्वाचे पाऊल ठरावे.





**कळंबोली : राज्यात कोरोनाचा प्रभाव कमी झाला असून दुसरी लाट ओसरत असली तरीही सर्व नागरिकांनी कोरोना प्रतिबंधक लस घेणे अनिवार्य आहे. त्यानुसार नगरसेवक बबन मुकादम यांच्या सौजन्याने प्रभाग ८ येथील सनशाईन सोसायटीमध्ये कोव्हिशिल्ड लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी कळंबोली शहर अध्यक्ष रविशेठ पाटील व अन्य उपस्थित होते.**

# उरण नगर परिषदेमध्ये कायदेविषयक जनजागृती शिबिर

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणमार्फत उरण तालुका विधी सेवा समितीतर्फे कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी सोमवारी (दि. ४) उरण नगर परिषद कार्यालयात कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिरामध्ये उरण न्यायालयातील सहदिवाणी न्यायाधीश राहुल बी. पोळ, नगराध्यक्ष सायली म्हात्रे, अनिल जगधनी, तसेच ॲड. पराग म्हात्रे, ॲड. व्ही. एल. पाटील, ॲड. किशोर ठाकूर, ॲड. तेजस्विनी कोळी, उरण न्यायालयातील विधिज्ञ, न्यायालयीन कर्मचारी, नगर परिषद कर्मचारी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ॲड. पराग म्हात्रे यांनी शिबिराचे सूत्रसंचालन करून उपस्थितांना कायदेविषयक मार्गदर्शन केले. ॲड. व्ही. एल. पाटील यांनी महिलांसाठी कायद्यामधील तरतुदींबाबत महिती दिली.

ॲड. किशोर ठाकूर यांनी गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र निवडीस प्रतिबंध कायदा १९९४ याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. ॲड. तेजस्विनी कोळी यांनी लोकअदालतबाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात सहदिवाणी न्यायाधीश राहुल बी. पोळ यांनी नालसा अंतर्गत येणाऱ्या विविध योजनांचे महत्त्व पटवून दिले. उरण तालुका विधी सेवा समितीमार्फत कायदेविषयक जनजागृती करत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला.

# उरणमधील ७० शाळा सुरू

**उरण : वार्ताहर**

शासनाच्या आदेशानुसार उरण तालुक्यातील शहर व ग्रामीण भागातील ७० शाळा सोमवारी सुरू झाल्या. पहिल्या दिवशी ६१३ शिक्षक व ८,३४३ विद्यार्थ्यांनी उपस्थिती दाखवली असल्याची माहिती उरण गटशिक्षणाधिकारी के. बी. अंजने यांनी दिली.

मागील दीड-दोन वर्षांपासून प्रादूर्भाव रोखण्यासाठी शाळा, महाविद्यालये बंद करण्यात आली होती. सोमवारी उरण तालुक्यातील शहरी भागातील आठवी ते बारावीपर्यंतच्या आठपैकी सात शाळा सुरू झाल्या आहेत.

या सात शाळांमध्ये १,३५० विद्यार्थी, तर १०३ शिक्षकांनी हजेरी लावली होती.



ग्रामीण भागातील ५वी ते १२वीपर्यंतच्या एकूण ६७ पैकी ६२ शाळांची घंटा वाजली. या ६२ शाळांमध्ये ६,९९३ विद्यार्थी आणि ५१० शिक्षक उपस्थित होते. पुन्हा एकदा शाळेत विद्यार्थ्यांचा किलबिलाट सुरू झाला आहे.

# 'मतदार साक्षरता आणि निवडणुकीत सहभाग' मोहिमेस सुरुवात

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका निवडणूक विभागाच्या वतीने स्वीप अर्थात पद्धतशीर मतदार साक्षरता आणि निवडणुकीत सहभाग मोहिमेस गुरुवार (दि. ७) पासून सुरुवात झाली. या माहिमेंतर्गत पालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांनी, तसेच १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवयुवकांनी स्वतःचे नाव मतदार यादीत नोंदणी करावी, तसेच पद्धशीरपणे नवमतदार नोंदणी आणि निवडणुकीत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढावा म्हणून परिसरात जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रम, चर्चासत्र व सामाजिक संदेश देणाऱ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभागनिहाय गृहनिर्माण सोसायट्यांचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व सक्रिय सभासदांनी एकत्र येऊन गृहनिर्माण सोसायटीच्या आवारात एकदिवसीय मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करावे. त्याचबरोबर सोसायटीच्या प्रत्येक घरामध्ये जाऊन पदाधिकाऱ्यांनी जनजागृती करून जास्तीत जास्त मतदार नोंदणी करावी, तसेच सक्रिय स्वयंसेवी संस्था व सेवाभावी संस्थेच्या आवारात किंवा जवळच्या परिसरात जनजागृती करून नवयुवकांची नावे मतदार यादीत नोंदणी करावी. बचतगट, व्यावसायिक, उद्योजक ऑनलाईन चर्चासत्र व ओळख परेडचे आयोजन केले जाणार आहे. व्यावसायिकांनी 'साक्षर मतदार कसा असावा' या विषयावर व्हिडिओ बनवून स्वतःच्या व्यवसायाची माहिती किंवा जाहिरात करावी, असे आवाहन उपायुक्त विठ्ठल डाके यांनी केले आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शाळा-कॉलेज विद्यार्थी, हौशी आणि व्यावसायिक कलाकारांना वाव देण्यासाठी पथनाट्य स्पर्धेचे आयोजन केले आहे. सर्व हौशी आणि व्यावसायिक कलाकारांनी वरील विषयानुसार विविध जिंगल्स, ऑडिओ, रिल्स, व्हिडिओ बनवून जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली राहील. याचबरोबर उत्साही एनसीसी, एनएसएस, एनवाययूएस महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा गट तयार करून पनवेल महानगरपालिका मुख्यालय भेट आयोजन करून विस्तृतपणे माहिती दिली जाणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल, तसेच स्पर्धेत सहभाग घेणाऱ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. अधिक माहितीसाठी ९३७२१५४५३३ किंवा ई-मेल pmcevent2016@gmail.com यावर संपर्क साधावा.

# पोटच्या मुलासह स्वत:ही केले विषप्राशन

## मुलाचा मृत्यू; महिला अत्यवस्थ

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल भागात राहणाऱ्या एका महिलेने विषारी द्रव्य पिऊन आपल्या दोन वर्षाच्या लहान मुलालादेखील विषारी द्रव्य पाजल्याने यात तिच्या दोन वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या घटनेत ही महिला बचावली असून पनवेल शहर पोलिसांनी तिच्यावर मुलाची हत्या केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. बहिणीच्या पतीने तिच्यासोबत लग्न करण्यास नकार दिल्याने तिने अशा प्रकारे टोकाचे पाऊल उचलल्याचे उघड झाले आहे. या महिलेवर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू असून ती बेशुद्धावस्थेत आहे.

या घटनेतील आरोपी महिलेचे नाव सरितादेवी महेंद्रकुमार (२०) असे असून तिच्या दोन वर्षीय मुलाचे नाव ऋषभ असे आहे. आरोपी सरितादेवीचे आपल्या सख्या बहिणीचा पती राजकुमार महंतो याच्यासोबत प्रेमसंबंध होते. त्यामुळे सरितादेवीने त्याच्यामागे लग्न करण्यासाठी तगादा लावला होता, मात्र राजकुमार याने तिच्यासोबत लग्न करण्यास नकार दिल्याने संतापलेल्या सरितादेवी हिने रागाच्या भरात स्वतः विषारी द्रव्य प्राशन केले. त्यानंतर तिने आपल्या दोन वर्षाच्या मुलालाही विषारी द्रव्य पाजले.

या घटनेत सरितादेवीचा मुलगा ऋषभ मृत झाला आहे, तर ती स्वतः अत्यवस्थ झाल्यामुळे तिला उपचारार्थ एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांनी सरितादेवी विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून अधिक तपासाला सुरुवात केली आहे.



**रसायनी : आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने महास्वराज अभियानांतर्गत ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे येथे आधार कार्ड शिबिर घेण्यात आले. या शिबिराला मंडल अधिकारी मोरे, तलाठी गोंधळी, डॉ. अविनाश गाताडे, सरपंच हरिश बांडे तसेच प्रतिक भोईर, चंद्रहास गोठळ, योगेश साठे उपस्थित होते. ग्रामपंचायत सदस्य मनोज पवार यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.**

# ट्रेलरच्या धडकेने वृद्धाचा मृत्यू

**पनवेल :** भरधाव ट्रेलरच्या धडकेने होंडा ॲक्टिवा स्कुटीवरील चालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना तालुक्यातील कोन पोलीस चौकीसमोरील रस्त्यावर घडली. बाळाराम बाबरे (वय ७१ ) हे त्यांच्या ताब्यातील होंडा ॲक्टिवा स्कुटी घेऊन कोन पोलीस चौकीजवळील रस्त्यावरून जात असताना भरधाव ट्रेलरने दिलेल्या धडकेमुळे ते गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## संपादकीय

# उदे गं अंबे उदे

दीड-पावणेदोन वर्षांनंतर महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रे आणि देवळांची कवाडे एकदाची खुली झाल्यामुळे भाविकांनी मनातल्या मनात का होईना सुटकेचा निःश्वास सोडला असेल आणि मनोभावे हात जोडले असतील. कोरोनाची पहिली लाट ओसरल्यानंतर महाविकास आघाडीच्या सरकारने घाईघाईने मद्याची दुकाने उघडण्यास परवानगी दिली. यथावकाश मद्यालये आणि उपाहारगृहे देखील सुरू झाली. अर्थव्यवस्था सुरळीत करण्यासाठी हे आवश्यकच होते, असे सरकारतर्फे स्पष्ट करण्यात आले. कोरोनाचे निर्बंध पाळून मंदिरे का उघडत नाही, असा सवाल भारतीय जनता पक्षाने सरकारला केला. त्याचे उत्तर मात्र ठाकरे सरकारकडे नव्हते.

**कोरोना विषाणूच्या थैमानामुळे प्रदीर्घ काळ सर्वांनाच घरात अडकून पडावे लागले. दुर्दैवाचा फेरा सगळ्यांच्याच नशिबी एकाच वेळी आला. या कोरोनाच्या साथीमध्ये कित्येकांनी आपले आप्तेष्ट गमावले. कित्येकांचे रोजगार बंद झाले. लाखो कुटुंब देशोधडीला लागली. कोरोनाविरुध्दची लढाई दीर्घकाळ चालणार असल्याचा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी सुरुवातीलाच दिला होता. भारतीय नागरिकांनी इतिहासात पहिल्यांदाच देशव्यापी कठोर लॉकडाऊन अनुभवला अन् तोही थोडाथोडका नव्हे तर तब्बल दोन महिन्यांहून अधिक काळ लांबलेला. त्या टाळेबंदीनंतर पहिल्यांदाच गुरुवारी राज्यातील मंदिरांची कवाडे पुन:श्च उघडली. गावागावांतील देवळांमधून पहाटेच्या समयी जो घंटानाद झाला, त्याने सारे समाजजीवन झंकारून उठले असेल. काकड आरतीच्या सुरांनी आसमंत गहिरा होऊन गेला असेल. त्या आरतीच्या सुरात आणि घंटानादात उगवतीचे रंग वेगळेच दिसू लागलेले अनेकांनी अनुभवले असेल. संकटाच्या काळात संकटमोचक ईश्वरच गाभाऱ्यात बंदिस्त आहे ही कल्पनाच भाविकांना सहन होत नव्हती. अर्थात, हे स्वाभाविकच म्हणावे लागेल. मंदिरे आणि देवस्थाने यांचे देखील एक अर्थशास्त्र असते. अक्षरश: लाखो कुटुंब देवस्थानांच्या व्यवहारांवर अवलंबून असतात, आपापली पोटे भरत असतात. मंदिरे उघडण्यासाठी भाजपने, तसेच वंचित आघाडीने काही महिन्यांपूर्वी उग्र आंदोलने केली होती हे अनेकांना आठवत असेल. विरोधी पक्षाच्या आग्रहाच्या रेट्याला अखेर यश आले आणि ठाकरे सरकारला मंदिरे उघडण्यावाचून पर्याय उरला नाही. मंदिरे उघडताक्षणी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी देवदर्शनाची प्रचंड आस लागल्याप्रमाणे भल्या सकाळी नजीकची देवळे गाठून देवदर्शनाचा लाभ घेतला. आपल्या नाकर्तेपणापायी ही देवळे इतके महिने बंद होती याची जाणीव होऊन त्यांनी देवापुढे नाक घासायला हवे होते. मंदिरांतील गर्दीमुळे कोरोना वाढतो हा आघाडी सरकारचा लाडका सिद्धांत आहे. तथापि कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करवून देवस्थाने उघडून टाकल्यामुळे काहीच बिघडणार नव्हते. तसे ते बिघडायचे असते, तर दुकाने आणि मॉल उघडल्यानंतर कोरोना पसरला असता किंवा गणेशोत्सवानंतर तिसरी लाट येऊन ठेपली असती. सुदैवाने तसे काही घडले नाही. विघ्नहर्त्या गणेशाने कोरोनाचे संकट पिटाळून लावले असेच म्हणावे लागेल. कोरोनाचा धोका सध्या कमी झालेला असला, तरी सुजाण नागरिक म्हणून काही पथ्ये आपल्याला पाळावीच लागतील. कोरोनाचे उच्चाटन झाले असे समजून देवदर्शनासाठी देवालयांमध्ये झुंबड करण्यात काहीच शहाणपणा नाही. अजून काही काळ तरी काळजी घेतलीच पाहिजे असे वाटते. नवरात्रीच्या घटस्थापनेच्या दिवशीच देवस्थाने आणि मंदिरांचे दरवाजे भक्तांसाठी खुले झाले आहेत ही निश्चितच समाधानाची बाब आहे. याचे मनोभावे आणि मन:पूर्वक स्वागत करायला हवे.**

# शेतकरी कामगार पक्षाचा असंगाशी संग




शेतकरी कामगार पक्षाच्या (शेकाप) अलिबाग शहरातील प्रमुख कार्यकर्त्यांचा मेळावा नुकताच अलिबाग येथे पार पडला. या मेळाव्याच्या निमित्ताने शेकापने अलिबाग नगर परिषदेच्या आगामी निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला. कोविड योद्ध्यांचा सत्कार (हे सगळे शेकापचे कार्यकर्ते च होते) आणि नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांची स्तुती या पलीकडे या मेळाव्यात काही झाले नाही. तसे पाहिले तर हा प्रशांत नाईक आणि त्यांच्या टीमचा कौतुक सोहळाच होता. या मेळाव्याची दखल घेऊन त्यावर काही लिहावे, असे काही विशेष घडले नाही.

एक मात्र घडले, शेकापचे माजी आमदार पंडित पाटील यांनी या मेळाव्यात जोरदार भाषण करून आपल्या पक्षाच्या नेतृत्वाला कानपिचक्या दिल्या. त्यांनी आमदार जयंत पाटील यांच्या उपस्थितीच पक्षनेतृत्वाच्या धोरणांवर व चुकांवर जाहीर टीका केली, वस्तुस्थिती मांडली, आपल्या नेत्यांना काही इशारे दिले.

शेकापच्या नेत्यांनी असंगाशी संग करण्याची चूक केली. पक्ष नेतृत्वाची चुकलेली धोरणे, रायगड जिल्ह्यातील 'शिखंडी' यामुळेच रायगड जिल्ह्यात शेकापचा पराभव झाला. पक्षनेतृत्वाच्या चुकांमुळेच आम्ही सर्व माजी झालो. नगराध्यक्ष प्रशांत नाईक हेच अलिबागचे ब्रॅंड आहेत, असे माजी आमदार पंडित पाटील या मेळाव्यात म्हणाले. त्यांची ही विधाने बरेच काही ते सांगून जातात. त्याची दखल मात्र नक्की घ्यायला हवी. पंडित पाटील असे का म्हणाले, ही कारणे शोधायला हवीत.

खरे तर २०१४ व २०१९च्या लोकसभा निवडणुकीत शेकापने शिवसेनेबरोबरच युती करावी, असे शेकापच्या दुसऱ्या फळीतील नेत्यांना वाटत होते, परंतु त्यास शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांचा विरोध होता.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

जयंत पाटील यांचा शिवसेनेला नव्हे, तर माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांना वैयक्तिक विरोध होता. केवळ गीतेंचा पराभव व्हावा, म्हणून जयंत पाटील यांनी २०१४ साली लोकसभा निवडणुकीत पक्षाचा उमेदवार उभा केला होता. परंतु गीते विजयी झाले. २०१९च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसशी युती केली आणि गीतेंचा पराभव करण्यात जयंत पाटील यशस्वी झाले, परंतु त्याचे परिणाम शेकापला भोगावे लागले. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत अलिबाग, पेण, उरण या मतदारसंघांमधील शेकापच्या तगड्या उमेदवारांचा पराभव झाला. लोकसभेत शेकापने राष्ट्रवादीला मदत केली, परंतु विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने शेकापला मदत केली नाही. त्यामुळे शेकापच्या उमेदवारांचा पराभव झाला. जर शिवसेनेशी शेकापची युती असती तर अलिबाग, पेण व उरण मतदारसंघातील शेकापचे उमेदवार विजयी झाले असते. आमच्या नेत्यांनी असंगशी संग केल्यामुळे पक्षाचे नुकसान झाले. असे शेकापचे कार्यकर्ते खाजगीत सांगयचे, परंतु जयंत पाटलांसामोर बोलण्याचे धाडस कुणी करत नव्हते. ते धाडस पंडित पाटील यांनी केले. यातून धडा घ्या, राष्ट्रवादीशी पुन्हा युती करू नका, असे त्यांना सुचवायचे आहे.

रायगडातील शिखंडीमुळे आमचा पराभव झाला, असे पंडित पाटील म्हणाले. त्यांचा रोख अर्थातच खासदार सुनील तटकरे यांच्या दिशेने होता. अलिबाग विधानसभा मतदारसंघात अलिबाग व मुरूड हे दोन तालुके आणि रोहा तालुक्यातील चणेरे या रायगड जिल्हा परिषदेच्या गटाचा समावेश आहे. अलिबाग तालुक्यात शेकापची ताकद आहे. मुरूडमध्ये शेकाप व राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद बऱ्यापैकी आहे. चणेरामध्ये राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. अशा परिस्थितीत मुरूड तालुक्यात व चणेरा येथे शेकापचे उमेदवार पंडित पाटील पिछाडीवर राहिले. राष्ट्रवादीने फसवल्यामुळचे असे घडले, असे पंडित पाटील यांना वाटत असावे.

अलिबागचे नगराध्यक्ष प्रशांत नाईक हेच अलिबागचे ब्रॅंड आहेत. तोच ब्रॅंड अलिबागमध्ये चालणार. दुसरा ब्रॅंड अलिबागमध्ये चालणार नाही, असे पंडित पाटील म्हणाले. त्यालादेखील कारणे आहेत. २ ऑगस्ट रोजी अलिबागमधील शेतकरी भवन येथे झालेल्या पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी प्रशांत नाईक यांच्यावर टीका केली होती, त्यांच्यावर नाराजी व्यक्त केली होती. अलिबाग नगर परिषदेत शेकापची सत्ता येते. नगर पारिषद निवडणुकीत पक्षाचे सर्वच्या सर्व उमेदवार विजयी होतात, परंतु विधानसभा निवडणुकीत पक्षाचा उमेदवार अलिबाग शहरात पिछाडीवर राहतो, असे का होते. अलिबाग शहरात जी विकासकामे झालीत, ती केवळ प्रशांत नाईक यांच्यामुळे नाही झालीत. अलिबाग नगर परिषदेचा बजेट तितका नाही. आम्ही आमदार होतो म्हणूनच अलिबाग शहरात विकासकामे झालीत. असे जयंत पाटील म्हणाले होते. त्यामुळे अलिबाग शहरातील नाईक यांचे समर्थक नाराज झाले होते. प्रशांत नाईक यांची नाराजी परवडणारी नाही. प्रशांत नाईक यांना नाराज केल्यास अलिबाग शहरात पक्षाचे नुकसान हाईल, हे पंडित पाटील जाणून आहेत. (हे जयंत पाटील यांनादेखील माहीत आहे, परंतु ते अलिबाग शहरात वेगळा प्रयोग करण्याच्या विचारात आहेत) म्हणूच पंडित पाटील यांनी प्रशांत नाईक यांचा अलिबागचा ब्रॅंड असा उल्लेख केला. पक्षनेतृत्वाने अलिबागमध्ये बदल करण्याचा प्रयोग म्हणून दुसरे एखादे नेतृत्व उदयास आणण्याचा प्रयोग केल्यास तो पक्षाला परवडणार नाही. अलिबागमध्ये नेतृत्व बदलण्याचा प्रयत्न केल्यास अंगाशी येईल, असेच पंडित पाटील यांना सुचवायचे होते. पंडित पाटील यांच्या सूचनांचा पक्षनेतृत्वाने किती गांभीर्याने विचार केलाय, हे येत्या काही दिवस समजेलच.

# केंद्रीय समितीकडून महाड, पोलादपुरातील दरडग्रस्त भागाची पाहणी; अधिकाऱ्यांबरोबर चर्चा


(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथकाने पोलादपूर तालुक्यातील सुतारवाडी आणि केवनाळे, तसेच महाड तालुक्यातील तळीये या दरडग्रस्त गावांची पाहणी केली. त्यानंतर नागोठणे येथील रिलायन्स कंपनीच्या सभागृहात केंद्रीय समितीच्या पथकाने लोकप्रतिनिधी व प्रशासकिय अधिकाऱ्यांकडून दरडग्रस्तांच्या नुकसानीबाबत अधिक माहिती घेतली.

केंद्रीय वित्तमंत्रालयाचे संचालक अभेयकुमार, कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुभाष चंद्रा, ग्रामीण विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त आयुष पूनिया यांच्या केंद्रीय पथकाने सोमवार व मंगळवारी तळीये, साखर सुतारवाडी, केवनाळे या दरडग्रस्त गावांना भेट दिली. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी नागोठणे रिलायन्सच्या सभागृहामध्ये केंद्रीय पथकाला दरड कोसळून झालेली दुर्घटना, या दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाने केलेली कार्यवाही तसेच दुर्घटनाग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन याबाबत संगणकीय सादरीकरणद्वारे सविस्तर माहिती दिली.

या वेळी कोकण विभागीय आयुक्त विकास पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत, कार्यकारी अभियंता सुखदेवे, पशुसंवर्धन उपसंचालक डॉ. सुभाष मस्के, जिल्हा पशुधन विकास अधिकारी डॉ. बंकट आर्ले, उपसंचालक बोराडे, जिल्हा कृषी विकास अधिकारी खुरकुटे, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय सुरेश भारती, रोहा उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, तहसीलदार कविता जाधव, महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसीलदार दिप्ती देसाई, तहसीलदार विशाल दौंडकर, महाड नगरपालिका मुख्याधिकारी रोडगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक तसेच इतर विभागांचे प्रमुख, स्थानिक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाहणी दौरा आणि अधिकारी स्तरावर झालेल्या चर्चेचा अहवाल केंद्र सरकारला सादर करून यासंदर्भात राज्य सरकारला सूचना देण्यात येतील, असे केंद्रीय पथकातील सदस्यांनी सांगितले.

# मुरूडमध्ये सातबारा उताऱ्याचे घरोघरी वितरण

**मुरूड : प्रतिनिधी**

सातबारा म्हणजे मालकी हक्क दाखवणारा दस्तऐवज असून त्याचे सर्वांनी व्यवस्थित जतन करावे. त्याचप्रमाणे दरवर्षाला नवीन सातबारा काढून आपल्या मालमत्तेमध्ये इतरांचा समावेश तर झाला नाही ना, याची खातरजमा करावी, असे प्रतिपादन मुरूडचे निवासी नायब तहसीलदार रवींद्र सानप यांनी केले.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तहसीलदार गोविंद वाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरूड तालुक्यात डिजिटल भूमी अभिलेख अधुनिकीकरण कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. त्यानुसार तालुक्यातील एकदरा, उंडरगाव, टोकेखार, कोर्लई, सुरई, मीठेखार साळाव, तळेखार, वेळास्ते या गावांत २ ऑक्टोबर रोजी डिजिटल सातबारा वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी निवासी नायब तहसीलदार सानप शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत होते.

नायब तहसीलदार गोविंद कुटुंबे, जिल्हा परिषद सदस्य राजश्री मिसाळ, एकदरा सरपंच रामकृष्ण आगरकर, मंडळ अधिकारी विजय मापुस्कर, नांदगाव मंडळ अधिकारी संजय तवर, बोर्ली मंडळ अधिकारी लक्ष्मण शेळके, तलाठी रेश्मा वीरकुड, सपना वायडे, तलाठी मुरुड रुपेश रेवस्कर यांच्यासह शेतकरी या वेळी उपस्थित होते.


(छाया : संजय करडे)

# रायगड जिल्ह्यात बांबूच्या बेटांची निर्मिती



**अलिबाग : प्रतिनिधी**

जमिनीची धूप रोखण्यासाठी जिल्हा परिषदेतर्फे ठिकठिकाणी बांबूची बेटे निर्माण करण्यात येत आहेत. रायगड जिल्ह्यात चार लाख बांबूची लागवड करण्याचे उद्दिष्ट हाती घेण्यात आले असून, महाड व पोलादपूर तालुक्यात जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बांबूची रोपे लावण्याचे काम हाती घेण्यात आले असून हे काम महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात येत असल्याची माहिती कृषी अधिकारी मनरेगा संजय चव्हाण यांनी दिली आहे.

रायगड जिल्ह्यातील महाड व पोलादपूर तालुक्यात २२ व २३ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे तेथील नदीला पूर येऊन मोठी आर्थिक हानी झाली. पुराच्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात जमिनीची धूप झाल्याचे दिसून आले. यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना, पूरनियंत्रण व संरक्षण, धुपप्रतीबांधक कामे करणे गरजेचे असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे रायगड जिल्ह्यात बांबूच्या बेटांची निर्मिती करण्यात येणार आहे. बांबूच्या बेटांमुळे पूरपरिस्थिती जमिनीची होणारी धूप रोखली जाण्यास मदत होईल.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाड, पोलादपूर या तालुक्यांमध्ये बांबू लागवडीचे काम सुरू करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यात लावण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातून बांबूची रोपे आणण्यात येत आहेत. ही रोपे रोजगार हमी योजनेअंतर्गत लावण्यात येत असून, यामुळे रोजगार निर्मिती होत असल्याचे संजय चव्हाण यांनी सांगितले.

# खालापूर प्रशासनाला आपत्कालीन मदत साहित्याची भेट

## गोदरेज कारखाना व्यवस्थापनाचे सामाजिक उतरदायित्व


(छाया : विनायक माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

आपत्कालीन प्रसंगी मदतीसाठी अत्याधुनिक साधनसामुग्रीची असलेली गरज ओळखून खालापूर तालुक्यातील गोदरेज आणि बॉईस मॅन्यु कारखाना व्यवस्थापनाने बुधवारी (दि. ६) सामाजिक उत्तरदायित्त्व (सीएसआर) फंडातून खालापूर प्रशासनाला आपत्कालीन साहित्य भेट दिले.

खालापूर येथील सरनौबत नेताजी पालकर सभागृहात बुधवारी आपत्कालीन साहित्य हस्तांतरण आणि प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी खालापूर प्रशासनाला आपत्कालीन साहित्य भेट देण्यात आले. त्यामध्ये बोट, लाईफ जॅकेट्स, दुर्बीण, वैद्यकीय साहित्याचा समावेश आहे.

कारखाने, पर्यटनस्थळे, द्रुतगती मार्ग, राष्ट्रीय महामार्ग असल्याने खालापूर तालुका कायम दुर्घटनेच्या छायेत तालुका असतो. शिवाय नैसर्गिक आपत्तीदेखील वारंवार येत असतात. यामुळे प्रशासनाला आपत्कालीन परिस्थितीत आधुनिक मदत साहित्य मिळाल्यास अनेक जीव वाचवण्यासाठी मदत होईल, या हेतूने गोदरेज आणि बॉईस मॅन्युने पुढाकार घेवून ही मदत केल्याचे गोदरेजचे तानाजी पाटील यांनी या वेळी सांगितले.

तहसीलदार आयुब तांबोळी, खालापूर पोलीस ठाण्याचे निरिक्षक अनिल विभुते, पोलीस उपनिरीक्षक बजरंग राजपूत, पोलीस पाटील अनंता ठोंबरे, अपघातग्रस्त मदत पथकाचे हनीफ कर्जीकर, राजेश पारठे आदि उपस्थित होते.

# अंबा नदीचे पाणी झाले गढूळ

## पालीतील नागरिकांना माती व चिखलमिश्रीत पाणीपुरवठा

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्याचे मुख्यालय व अष्टविनायकांपैकी एक स्थान असलेल्या पाली शहराला अंबा नदीचे पाणी कोणतीही प्रक्रिया न करता पुरविले जाते. गेल्या दोन-तीन दिवसांपासून नदीचे पाणी गढूळ झाले आहे. परिणामी पालीतील नागरिकांना माती व चिखलमिश्रीत पाण्याचा पुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पालीतील तब्बल १५ हजाराहून अधिक लोक अंबा नदीच्या पाण्याचा वापर करतात. पालीची शुद्ध नळपाणी पुरवठा योजना मागील १५ ते २० वर्षांपासून प्रलंबित आहे.

सध्या अंबा नदीच्या पाण्यात गाळ व चिखलाचे प्रमाण वाढले आहे. मोठ्या प्रमाणात हिरवळ व शेवाळ असते. कधी कधी साप, मासे नळाद्वारे थेट घरात येतात. या पाण्याला उग्र स्वरूपाची दुर्गंध येते, चवही खराब लागते. पाणी प्रदूषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. परिणामी बहुसंख्य नागरिक अधिकचे पैसे खर्च करुन बाटलीबंद पाण्याचा आधार घेऊ लागले आहेत.





(छाया : धम्मशील सावंत)

**अंबा नदीचे पाणी गढूळ झाल्याने चिखलयुक्त पाण्याचा पुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. प्रलंबित नळपाणी योजना लवकर कार्यान्वित करावी.**

**-रमेश मूल्या, नागरिक, पाली, ता. सुधागड**

**ही पाणीपुरवठा योजना माझ्या काळातील नाही. नगर पंचायत प्रशासक म्हणून ही योजना अंमलात आणण्यासाठी स्थानिक आमदार व लोकप्रतिनिधी यांच्यासोबत चर्चा सुरू आहे. आम्ही त्यांना यासाठी सर्व सहकार्य करू. नागरिकांनी पाणी गाळून व उकळून प्यावे**

**-दिलीप रायण्णावार, प्रशासक, नगरपंचायत, पाली, ता. सुधागड**

### शुद्ध पाणी योजनेची प्रतीक्षा

*शासनाने केलेल्या सर्व्हेनुसार पालीच्या पाणीपुरवठा योजनेचे नियोजन करण्यात आले होते. एकूण सात कोटी ७९ लाखाचा निधी व १० टक्के लोकवर्गणीद्वारे ही योजना उभी राहणार होती. मात्र श्रेयवादामध्ये ही योजना रखडली. त्याबरोबर १० टक्के लोकवर्गणीचा प्रश्नदेखील होता. दरम्यानच्या काळात पालीला 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळाला आहे. त्यानंतर या पाणीपुरवठा योजनेसाठी ११ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. लोकवर्गणीची अट शिथील करण्यात आली आहे.*

# माथेरानमध्ये पाणी महागले

## पाणीपट्टी वाढीमुळे स्थानिक मेटाकुटीला

**कर्जत : बातमीदार**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (एमजेपी) पाणीपट्टीत वाढ केल्यामुळे माथेरानमधील नागरिक आणि हॉटेल व्यावसायिकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. पर्यटन व्यवसाय ठप्प असतानाच पाणीपट्टीत वाढ झाल्याने स्थानिक अक्षरशः मेटाकुटीला आहेत.

माथेरानकरांचा उदरनिर्वाह फक्त पर्यटनावर चालतो. कोविडमुळे माथेरानचे पर्यटन दीड वर्षे बंद होते. त्यामुळे येथील नागरिकांचे आर्थिक गणित बिघडले. येथील पर्यटन व्यवसाय सुरू होऊन जेमतेम तीन महिने होत नाहीत तर एमजेपीने पाणीदरवाढ करून येथील स्थानिक आणि हॉटेलवाल्यांच्या तोंडचे पाणी पळविले आहे.

**दर तीन वर्षांनी पाणी दरवाढ केली जाते. आमचा अर्थ विभाग यावर काम करत असतो. अर्थ विभागाचा तीन वर्षातील नफा-तोटा याचा अभ्यास केल्यानंतर ही दरवाढ केली जाते. कोरोनानंतर ही दरवाढ केली आहे, त्यामुळे माथेरानला जर अभय योजना लागू झाली तर बिलामध्ये कपात होण्यासाठी विचार होऊ शकतो.**

**-व्ही. के. सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**



(छाया : संतोष पेरणे)

# सावरोली टोलनाक्याजवळ खाजगी बस उलटली; सात प्रवासी जखमी

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

चालकाचा ताबा सुटल्याने एक्स्प्रेस वेवरून चाललेली खाजगी प्रवासी बस बुधवारी (दि. ६) रात्री सावरोली टोलनाक्याजवळ उलटली. या अपघातात तीन महिलांसह सात प्रवासी जखमी झाले असून, त्यांना खोपोलीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

एसआरएस ट्राव्हलर्स या कंपनीची बस (केए ०१, एएफ ६६५६) बुधवारी रात्री मुंबईहून कर्नाटक राज्यात जात होती. एक्स्प्रेस वेवरील सावरोली टोलनाक्याजवळ रात्री ११.२० वाजण्याच्या सुमारास चालकाचा ताबा सुटल्याने बस पुणे बाजूकडील मार्गीकेवर पलटी झाली. या अपघातात सात प्रवासी जखमी झाले असून, त्यात तीन महिलांचा समावेश आहे. त्यापैकी प्रभा हनुमंत पोटे (वय ७०, रा. मीरा रोड), संगीता दयानंद पाटील (वय ४८, रा. अंधेरी मुंबई), सुरेखा सुधिनाथ शंकर गौडा (वय ६२, रा. नवी मुंबई), संदीप हनुमंत पोटे (वय ५०, रा. मीरा भाईंदर), मधू सुधिनाथ शंकर गौडा (वय ३२, रा. नवी मुंबई) यांना खोपोली नगर परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघातानंतर बसचालक पळून गेला असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत. चालक नशा करून बस चालवत असल्याचे प्रवाशांनी सांगितले. या अपघाताची नोंद खोपोली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अधिक तपास सुरू आहे.

(छाया : अरुण नलावडे)



# जि. प.च्या ४६ शाळांवर समायोजनाची कुऱ्हाड

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील एक ते पाच पटसंख्या असलेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या ४६ शाळांवर समायोजनाची कुऱ्हाड येणार आहे.

एक ते पाच पटसंख्या असलेल्या शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांचे समायोजन करण्याचे लेखी आदेश जिल्ह्यातील संबंधित पंचायत समितीच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे पटसंख्येअभावी जिल्ह्यातील तब्बल ४६ शाळा बंद करण्याची वेळ जि.प.च्या शिक्षण विभागावर आली असून, त्याचा फटका तेथील विद्यार्थ्यांना बसणार आहे.

युडायस प्लस या प्रणालीमधील माहितीनुसार रायगड जिल्ह्यातील ४६ शाळांत प्रत्येकी एक विद्यार्थी शिक्षण घेत आहे. त्यातील तीन शाळांमध्ये शून्य तर २२ शाळांमध्ये एक शिक्षक आणि २१ शाळांमध्ये दोन शिक्षक कार्यरत आहेत. समायोजन करावे लागणाऱ्या सर्वाधिक १५ शाळा महाड तालुक्यातील आहेत. पोलादपूरमधील चार, माणगावमधील सहा, रोह्यातील पाच, म्हसळ्यातील सहा, श्रीवर्धनमधील एक, तळा तालुक्यातील दोन, सुधागडातील एक, पेणमधील दोन आणि अलिबाग तालुक्यातील चार शाळा व त्या शाळांतील विद्यार्थांचे समायोजन करावे लागणार आहे.

# बेकरेवाडीतील शाळेवर झाड कोसळले

**कर्जत : बातमीदार**

माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या बेकरेवाडी आदिवासीवाडीमधील प्राथमिक शाळेच्या इमारतीवर बुधवारी (दि. ६) संध्याकाळी मोठे झाड कोसळले. त्यामुळे शाळा इमारतीचे नुकसान झाले असून, या आदिवासीवाडीतील विद्यार्थ्यांना अन्य ठिकाणी बसून शिक्षण घ्यावे लागणार आहे.



कर्जत तालुक्यातील बेकरेवाडी आदिवासीवाडीमध्ये रायगड जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे. या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग भरतात. बुधवारी सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान कर्जत तालुक्यात विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. या वेळी झालेल्या वादळात बेकरेवाडी आदिवासीवाडीमधील शाळा इमारतीवर मोठे झाड कोसळले. त्यामुळे शाळा इमारतीचे नुकसान झाले असून, येथील विद्यार्थ्यांना अन्य ठिकाणी बसून शिक्षण घ्यावे लागणार आहे.

दरम्यान, शाळा इमारतीवर पडलेले झाड त्वरीत बाजूला करावे, अशी मागणी विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे.

# पेण न्यायालयाच्या आवारात वृक्षारोपण

## तालुका विधी सेवा समिती, वनविभाग यांचा उपक्रम

**पेण : प्रतिनिधी**

तालुका विधी सेवा समिती व वनविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच पेण न्यायालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. न्यायाधीश आर. एन. मुजावर यांनी या वेळी मार्गदर्शन केले. तर वनरक्षक भूपेंद्र वारगे यांनी पर्यावरणासंबंधी, तसेच वन अधिनियमांबाबत माहिती दिली. पेण बार संघटनेचे अध्यक्ष ॲड. एन. एन. म्हात्रे व ॲड. गणेश म्हात्रे यांनी फॉरेस्ट ॲक्टविषयी माहिती सांगितली.

सरकारी वकील सतीश नाईक, वनपाल के. जी. चौधरी, वनपाल बालाजी आडे, वनरक्षक हनुमंत सूर्यवंशी यांच्यासह वनकर्मचारी, तसेच पेण, वडखळ व दादरी सागरी पोलीस ठाणे, पेण न्यायालयातील वकील व न्यायालयीन कर्मचारी यांनी सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विशेष मेहनत घेतली.



# पेण अंतोरे येथे वर्षावास मालिका

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या तीन महिन्यांच्या कालावधीत वर्षावास मालिका सुरू असते. पेण तालुका बौद्ध महासभेच्या वतीने अंतोरे येथील बुद्ध विहारात नुकताच वर्षावास मालिकेचे १४ वे पुष्प संपन्न झाले.

वर्षावासामध्ये समाजातील प्रत्येक नागरिकांनी विहारात जाऊन पूजापाठ करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रवचनकार संतोष जाधव यांनी या वेळी केले, तसेच त्यांनी आपल्या धम्म प्रवचनात तथागत भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराजयांच्या जीवनावरील कथेची संपूर्ण माहिती दिली. या वेळी मारुती शिंदे यांनीही प्रवचनात्मक माहिती सांगितली.

बौद्ध महासभेचे पेण तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनावणे, महिला प्रमुख आसावरी जाधव, जिल्हा कोषाध्यक्ष एम. जी. शिंदे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत अडसुळे, राजेश कांबळे, माजी सदस्या रोहिणी अडसूळे, पोलीस पाटील सरिता रणपिसे, शारदा अडसुळे, राधाबाई रणपिसे आदिंसह नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित होते.



(छाया : अनिस मनियार)

# शासनाचे नियम पाळून नवरात्रोत्सव साजरा करा -पोलीस निरीक्षक संजय पाटील



(छाया : महादेव सरसंबे)

**रोहे : प्रतिनिधी**

नवरात्र उत्सव साजरा करण्यासाठी शासनाने काही मार्गदर्शक तत्त्वे घालुन दिली आहेत. त्यांचे पालन करून नागरिकांनी नवरात्रौत्सव साजरा करावा, असे आवाहन रोहा पोलीस ठाण्याचे निरीक्षक संजय पाटील यांनी केले

रोहा पोलीस ठाण्यात आयोजित केलेल्या शांतता समितीच्या बैठकीत निरीक्षक संजय पाटील उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. जिल्हा शांतता समितीचे सदस्य आप्पा देशमुख, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, नगरसेवक महेश कोलटकर, राकेश जैन, अजित मोरे, महेश रोकडे, इरफान दर्जी, राकेश शेडगे, पोलीस कर्मचारी महेश काळे आदी या बैठकीला उपस्थित होते.

# पालीतील बल्लाळेश्वर मंदिर दर्शनासाठी खुले

## गणेशभक्तांमध्ये नवचैतन्य व उत्साह

**पाली : प्रतिनिधी**

अनेक महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर गुरुवारी (दि. ७) पालीतील बल्लाळेश्वर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आल्याने भाविक व गणेशभक्तांत नवचैतन्य व उत्साह संचारला आहे. कोरोनाविषयक नियम व अटी पाळून गुरुवारी अनेक भाविकांनी आपल्या लाडक्या बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले.

कोरोनाचा प्रादुर्भाव व संसर्ग रोखण्यासाठी प्रार्थनास्थळे व मंदिरे बंद ठेवण्यात आली होती. सध्या कोरोनाची लाट ओसरत असून, रुग्णसंख्याही घटत असल्याने राज्य सरकारने काही नियम व अटी घालून गुरुवारपासून मंदिरे खुली करण्याचा निर्णय घेतला.

सुधागड तालुक्यातील पाली येथील बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टने जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार विशेष खबरदारी घेत उपाययोजना केल्या आहेत. कोरोनाविषयक सर्व नियम व अटींचे पालन करणाऱ्यांनाच बाप्पाचं दर्शन दिले जाणार आहे. भाविकांनी नियमांचे पालन करून ट्रस्टला सहकार्य करावे, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. धनंजय धारप यांनी केले आहे.



(छाया : धम्मशील सावंत)


**तहसिलदार उरण यांचे न्यायालयात**

कलम १५५ दावा क्र.      /२०२१

प्रति,

१. श्रीम. देवूबाई दत्तु मोहिते,
२. श्रीम. पुष्पलता दत्तु मोहिते,
३. श्री. वसंत दत्तु मोहिते,
४. श्री. प्रकाश दत्तु मोहिते,
५. श्री. निलेश दत्तु मोहिते,
६. श्रीम. जयश्री दत्तु मोहिते,
७. श्री. नरेश दत्तु मोहिते,
८. श्री. राजेंद्र दत्तु मोहिते,
९. श्री. विजय रघुनाथ पाटील,
१०. श्री. महिंद्रा मोहन चिमणे,
११. श्रीम. राजश्री अरुण पाटील,
१२. श्रीम. मेघा अरुण पाटील,
१३. श्री. तुषार अरुण पाटील,
१४. श्रीम. अनिता अशोक पाटील,
१५. श्रीम. कल्पीता अशोक पाटील,
१६. श्रीम. प्राजक्ता अशोक पाटील,
१७. श्री. नितांत अशोक पाटील,
१८. श्रीम. लाचना अशोक पाटील,
१९. श्री. सचिन अशोक पाटील,
रा. वेश्वी, ता. उरण, जि. रायगड ---अर्जदार

**विरुध्द**

१. श्रीम. आनंदीबाई दत्तु मोहिते,
रा. वेश्वी, ता. उरण, जि. रायगड ---सामनेवाले

**विषय :- महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६चे कलम १५५ प्रमाणे दावा. सुनावणी करिता हजर रहाणेबाबत.**

अर्जदार तसेच सामनेवाले यांस कळविणेत येते की, मौजे-वेश्वी, ता. उरण येथील स.नं. ९६/५, २६/२, २५/६, ४/६/अ२, ९६/५, ४२/७, ४४/२, ४६/३, १७/२ या ७/१२ वरील फेरफार क्र. २०४४ प्रमाणे सामनेवाले यांच्या नावाची नोंद कमी करणेबाबत अर्जदार यांनी या कार्यालयाकडे सादर केलेल्या अर्जाबाबत सदर दाव्याची सुनावणी दि. २२/१०/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता तहसिल कार्यालय, उरण येथे ठेवणेत आलेली आहे.

सदर सुनावणीस आपण स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत सर्व साक्षी पुरावे व कागदपत्रांसह या कार्यालयात सदर दिवशी व वेळी हजर रहावे. सदर सुनावणीस आपण हजर न राहिल्यास सदर प्रकरणांची सुनावणी आपले गैरहजेरीत घेणेत येवून सदर प्रकरणी आपणांस काहीही सांगायचे नाही, असे गृहित धरून उपलब्ध कागदपत्रांवरून निर्णय दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
तहसिलदार उरण

आयपीएलचा रनसंग्राम
आजचे सामने
■ हैदराबाद वि. मुंबई (दु. ३.३० वा., अबूधाबी)
■ बंगळुरू वि. दिल्ली (सायं. ७.३० वा., दुबई)

# हैदराबादचा बंगळुरूवर विजय



**अबूधाबी : वृत्तसंस्था**

हैदराबादने बंगळुरूचा ४ धावांनी पराभव केला. आयपीएल २०२१ स्पर्धेत हैदराबादचा हा तिसरा विजय आहे. हैदराबादने बंगळुरूसमोर विजयासाठी १४२ धावांचे आव्हान दिले होते, मात्र बंगळुरूने ६ गडी गमवून १३७ धावाच केल्या. या पराभवामुळे टॉप २मध्ये राहण्याचे बंगळुरूचे स्वप्न कठीण झाले आहे.

बंगळुरूची सुरुवात अडखळत झाली. कर्णधार विराट कोहली पहिल्या षटकात भुवनेश्वर कुमारच्या गोलंदाजीवर पायचीत झाला. अवघ्या ५ धावा करून तो तंबूत परतला. त्यानंतर डॅन ख्रिश्चियनही कमाल करू शकला नाही. सिद्धार्थ कौलच्या गोलंदाजीवर केन विल्यमसनने त्याचा झेल घेऊन तंबूचा रस्ता दाखवला. त्यानंतर श्रीकर भारतही १२ धावा करू बाद झाला. मग चौथ्या गड्यासाठी देवदत्त पडिक्कल आणि ग्लेन मॅक्सवेल यांनी डाव सावरला. मॅक्सवेलने आक्रमक खेळी केली, मात्र तो धावचीत झाल्याने सामन्याला कलाटणी मिळाली. त्यानंतर पडिक्कलही तंबूत परतला. त्याने ५२ चेंडूत ४१ धावा केल्या. या वेळी सामना बंगळुरूच्या पारड्यात असताना शाहबाज अहमद बाद झाला आणि संघावरील दडपण वाढले. एबी डिव्हिलियर्सलाही शेवटच्या षटकात संघाला विजय मिळवून देता आला नाही.

तत्पूर्वी विराट कोहलीने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंजीचा निर्णय घेतला होता. सनरायझर्स हैदराबादने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ७ बाद १४१ धावा केल्या होत्या. सलामीवीर जेसन रॉयने ३८ चेंडूत ४४ आणि केन विल्यमसनने २९ चेंडूत ३१ धावा केल्या. त्यानंतर अन्य कोणत्याही फलंदाजांना साजेसा खेळ करता आला नाही. बंगळुरूकडून हर्षल पटेलने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या.




# रायगडच्या खेळाडूंची राष्ट्रीय दोरी उडी स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोल्हापूर येथे झालेल्या पहिल्या राज्यस्तरीय दोरी उडी स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी सात सुवर्ण आणि चार रौप्यपदकांची कमाई केली. या खेळाडूंची औरंगाबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र आणि कोल्हापूर जम्प रोप असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत राज्याच्या १७ जिल्ह्यांतील स्पर्धकांनी सहभाग घेतला. या वेळी जंप रोप असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष मंदार पनवेलकर, सचिव संतोष खंदारे, प्रशिक्षक निलेश भोसले उपस्थित होते.

या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील संजना चव्हाण, वैष्णवी मोरे, हर्षदा कारंडे, कृपाश्री शेट्टी, चिराग शिवगण, कृष्णा पांडे, नावीन्य साळगावकर यांनी सुवर्णपदक, तर अंतरा दळवी, अन्वी सणस, ऐशानी सरकार, स्कंद धस यांनी रौप्यपदक पटकाविले. त्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

## आरोग्य प्रहर

### उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी काही टिप्स

उच्च रक्तदाबाची समस्या आजकाल खूप सामान्य झाली आहे. हे सहसा ३५ ते ४० वर्षांनंतर होते. उच्च रक्तदाबाचे कारण ताण आणि खराब जीवनशैली आहे. हृदय हे शरीराच्या सर्व भागांमध्ये रक्त पोहोचवण्याचे काम करते. जर हा दबाव वाढला तर उच्च रक्तदाब होतो आणि जर दबाव कमी झाला तर कमी रक्तदाबाची तक्रार निर्माण होते, परंतु योग्य आहार आणि निरोगी जीवनशैलीने हा आजार नियंत्रणात ठेवता येतो.

अन्नासोबत जास्त मीठ खाल्ल्याने तुमच्या शरीरात सोडियमचे प्रमाण वाढते. ज्यामुळे उच्च रक्तदाब, स्ट्रोकसह इतर गंभीर हृदयरोग होऊ शकतात. जर तुम्हाला उच्च रक्तदाबाची समस्या असेल, तर तुम्ही जेवणात मिठाचे सेवन कमी करा. याशिवाय प्रक्रिया केलेल्या अन्नाऐवजी ताजी फळे आपल्या आहारात घ्यावीत.

बरेच जण ऑफिसमध्ये काम करताना कॉफी व चहा पितात. यामुळे शरीरात चपळता येते. तज्ज्ञांच्या मते दिवसातून एक ते दोन कप कॉफी पिणे फायदेशीर आहे. जर तुम्हाला उच्च रक्तदाबाची समस्या असेल, तर कॅफिनचे सेवन कमी करा.

उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तीने निरोगी राहण्यासाठी नियमित व्यायाम करावा. ताण कमी करण्यासाठी योगा आणि ध्यानही करा.





पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त शिवाजीनगर येथील जरी मरी माता मंडळ आयोजित नवरात्री उत्सवाला पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत यांनी भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.



पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त बोरले येथील सार्वजनिक देवीचे आणि श्री सत्यनारायण महापूजेचे नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, सुशिला घरत, हेमलता म्हात्रे, वृषाली वाघमारे, अनिता पाटील, राजश्री वावेकर आदींनी दर्शन घेतले.




पनवेल : कोपर येथील जय बजरंग कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या देवीचे पूजन गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच तथा भाजप उलवे नोड-२चे अध्यक्ष विजय घरत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपाध्यक्ष अनंता ठाकूर, भारतीय मजदूर संघाचे तालुका उपाध्यक्ष सुधीर ठाकूर, युवा नेते साईचरण म्हात्रे उपस्थित होते.



मुरुडची ग्रामदेवता कोटेश्वरी देवीचे दर्शन घेताना भाविक.




## न व रा त्री चे रं ग




जय बजरंग कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, कोपर, ता. पनवेल



फुंडे (उरण) हायस्कूल शिक्षिकावृंद.



दापोली–पारगाव (ता. पनवेल) येथील अ. पां. भोईर विद्यालय व ज्युनियर कॉलेजच्या शिक्षिका.











पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने नवरात्रोत्सवादरम्यान सूर्योदयापूर्वी दुर्गामाता दौड घेण्यात येते. पहिल्या दिवशी ही दौड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापासून गावदेवी मंदिरापर्यंत देवीच्या जयघोषात झाली आणि तिची सांगता पुन्हा स्मारकाच्या येथे करण्यात आली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com